# जी.सी.सी. गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागणी अर्ज

## (Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देऊन Login करा.

⇩

Mark Verification / Xerox Copy Option बटनावर क्लिक करा.

⇩

Checkout Result List

⇩

A) Click option Mark Verification if you want for appropriate Candidate.

B) Click option Xerox Copy if you want for appropriate Candidate.

⇩

Take Challan

⇩

चलनाची प्रिंट घेतल्यानंतर सदर चलन SBI बँकेत भरावी.
(Deposit Amount Rs. १२०/- for Mark Verification or Rs. ४२०/- for Xerox Copy)

⇩

Upload Challan
(Extra Challan ie. ४२०/- is applicable for Xerox Copy, If you uploaded before for Mark verification of the same student)

⇩

Take Printout of appropriate Candidate.

❖ **टीप :-**

१. जर उमेदवाराने गुणपडताळणीसाठी रू. १२०/- (बँक शुल्कासह) चे चलन अगोदर भरले असेल व पुन्हा झेरॉक्स प्रतीची मागणी केल्यास पुन्हा रू. ४२०/- (बँक शुल्कासह) चे चलन भरावे लागेल.

२. अर्जाची प्रत व शुल्क भरलेल्या चलनाची प्रत परिषदेकडे पाठवू नये.

उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.

# शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा डिसेंबर- २०१६

## उत्तरपत्रिका छायाप्रत मागणी अर्जाबाबत सूचना

१. विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२. ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसांपर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. ऑनलाईन अर्जातील माहिती पुर्णपणे भरलेली असावी. अपुर्ण अर्ज सबमिट (submit) होणार नाही.

४. उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतीविषय रु. ४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही. (बँक सेवा शुल्क रु. २०/- भरावे लागेल)

५. शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या (SBI) कोणत्याही शाखेत चलनाने भरावे लागेल. हे चलन संस्थेस ऑनलाईन उपलब्ध होईल.

६. उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रु. ४००/- इतके शुल्क चलनाने भरुन अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७. अर्जदारास छायाप्रत मिळण्याचा संभाव्य कालावधी भ्रमणध्वनी द्वारे कळविण्यात येईल.

८. उत्तरपत्रिकेची छायाप्रतीची मागणी पोस्टाद्वारे असल्यास पोस्टाचा पुर्ण पत्ता संस्थेने जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे. (उमेदवारास उत्तरपत्रिकेची छायाप्रत संस्थेच्या पत्त्यावर पाठविण्यात येईल.)

९. समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०. उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११. पुनर्मूल्यांकनाची तरतूद नसल्याने उत्तरपत्रिकेची पुन्हा तपासणी केली जाणार नाही.

१२. परीक्षक/नियामक इ. ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१३. परीक्षेत गैरमार्ग अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१४. उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१५. संबंधित विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्यात येऊ नये. दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१६. मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

१७. ऑनलाईन अर्जाची प्रत (प्रिंट आऊट) व शुल्क भरलेल्या चलनाची प्रत परिषदेकडे पाठविण्याच्या आवश्यकता नाही.

# शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा डिसेंबर- २०१९
## गुणपडताळणीबाबत सूचना

१. गुणपडताळणीसाठी प्रतीविषय रु. १००/- (शंभर रुपये) शुल्क आकारण्यात येईल. (बँक सेवा शुल्क प्रती चलन २० रु. भरावे लागेल)
२. ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसांपर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात संबंधित टंकलेखन/लघुलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही.
३. गुणपडताळणीसाठी एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.
४. गुणपडताळणी अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास सबमिट होणार नाही.
५. गुणपडताळणी नंतर पुनर्मूल्यांकनाची तरतूद नाही.
६. गैरमार्ग अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची गुणपडताळणी करुन दिली जाणार नाही.
७. मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही. तसेच शुल्कही परत मिळणार नाही.
८. गुणपडताळणीचा निकाल संस्थेच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल उमेदवाराने संबंधित टंकलेखन संस्थेकडून निकाल प्राप्त करुन घ्यावा.
९. गुणपडताळणी अर्ज उमेदवाराने ऑनलाईन सबमिट केला असेल आणि पुन्हा उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबत अर्ज सादर करावयाचा असल्यास त्यास छायाप्रतीसाठी रु. ४००/- शुल्क स्वतंत्र ऑनलाईन चलनाने भरावे लागेल. (बँकसेवा शुल्क रु. २०/- भरावे लागेल.)
१०. उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. म्हणजे उमेदवाराने एखाद्या विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी केल्यास त्या विषयाची गुणपडताळणीही केली जाणार आहे.